अहमदनगर महानगरपालिका,अ.नगर
सार्व.बांधकाम विभाग
दि.28/10/2022

विषय : अतिरीक्त चटई क्षेत्र निर्देशांकापोटी प्रिमियम रक्कम - सन.2022-23 अंतर्गत 01 विकास कामाची फेर जाहिर निविदा क्र.1 ( पेटी पध्दतीने ) मागविणेबाबत.

संदर्भ : मा.उपायुक्त,अहमदनगर महानगरपालिका यांची दि.07/09/2021 रोजीची मान्यता

मा.सादर,

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये विनंती रिपोर्ट की, संदर्भिय पत्रानुसार खालील विकास कामास अतिरीक्त चटई क्षेत्र निर्देशांकापोटी प्रिमियम रक्कम - सन.2022-2023 अंतर्गत मा.उपायुक्त यांनी प्रशासकिय मान्यता दिलेली आहे, त्यानुसार सदर विकास कामाची फेर जाहिर निविदा क्र.1 ( पेटी पध्दतीने ) प्रसिध्द करणे प्रस्तावित आहे.

| अ.क्र. | कामाचा तपशिल | तांत्रिक मान्यता रक्कम |
|---|---|---|
| 1 | अहमदनगर मनपा हद्दीतील प्रभाग क्र.14 मधील श्रीरामनगर मेन रोड येथे रस्ता कॉक्रीटीकरण करणे (पवार घर ते आनंदकर ते काळे घर) | रू.4,70465<br>470465 |

त्यानुसार वरील कामाची जाहिर निविदा क्रमांक 21/80 दि.14/10/2022 रोजी मनपाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली होती.

| Sr.No | Envelopes | Start Date & Time | Expiry Date & Time |
|---|---|---|---|
| 1 | निविदा विक्री | 14-10-2022 10:00 | 20-10-2022 16:00 |
| 2 | निविदा स्विकृती | 14-10-2022 16:00 | 20-10-2022 17:45 |
| 4 | तांत्रिक लिफाफा उघडणे | 21-10-2022 10:00 | 21-10-2022 14:00 |
| 5 | व्यापारी लिफाफा उघडणे | 25-10-2022 10:00 | 25-10-2022 14:00 |

परंतू दि.20/10/2022 रोजी सदर कामाचे एकही निविदा प्राप्त झालेली नसल्याने वरील कामाची फेर जाहिर निविदा मागविणेकामी तसेच सोबत जोडलेली जाहीर -निविदा नोटीस मनपाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करणेस व सर्व ठेकेदारांना माहिती होणेसाठी सदर जाहिर निविदेची सुचना शासन निर्णय दि.27/09/2018 नुसार म्हणजे एक मराठी जिल्हास्तर, राज्यस्तरीय मराठी एक वर्तमान पत्रात प्रसिध्द करणेस व याकामी येणाऱ्या तदनुषंगीक खर्चास मान्यता मिळणेस्तव ऑफिस रिपोर्ट सविनय सादर.

( निंबाळकर एस.आर.)
उप अभियंता
अहमदनगर महानगरपालिका

मा.शहर अभियंता ,

अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
अर्थ विभाग
आवक नं.--3398--दि.2/11/22

मुख्यलेखाधिकारी
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर

D:\pendrive backup_11032021\Tender ... व ... जाहिर निविदा क्र 4 सन 2022-23.doc- 23 -

Scanned with OKEN Scanner

आर्थिक पृष्ठांकन -

विभागाने प्रस्तावित केलेप्रमाणे 'अ' नुसार कार्यवाहीकरता सादर.

लेखापरिक्षक कार्यालय
क्रमांक- ३९६६
नस्ती दाखल दि.- २/११/२२
नस्ती निर्गमन दि.-

[signature] 3.11.22
लेखापरिक्षक
अहमदनगर महानगरपालिका
अहमदनगर
[signature]
03/11/22

[signature] 3.11.22
मुख्य लेखापरिक्षक
अहमदनगर म.नगरपालिका
अहमदनगर

मा. उप. आयुक्त
'अ' प्रमाणे आदेशार्थ सादर
[signature]
7/11/2022

मा. उपायुक्त (सा)

प्रशासकीय मान्यतेनुसार
फेर निविदा प्रसिद्ध करणेस
सक्षमार्थ मान्य.
[signature]
14/11/22.

उपायुक्त (सा) कार्यालय
क्रमांक 13066
नस्ती दाखल दि 10/11/22
नस्ती निर्गमन दि 15/11/22

Scanned with OKEN Scanner

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर

## सार्वजनिक बांधकाम विभाग 28/64

### अतिरीक्त चटई क्षेत्र निर्देशांकापोटी प्रिमियम रक्कम - सन 2022-23 अंतर्गत

### सार्वजनिक बांधकाम विभाग/ फेर जाहीर नोटीस जाहिरात क्र.28 दिनांक- 14 /11/2022

मा.उपायुक्त,अहमदनगर महानगरपालिका हे **अतिरीक्त चटई क्षेत्र निर्देशांकापोटी प्रिमियम रक्कम - सन 2022-23 अंतर्गत** खालील नमुद विविध विकास कामांसाठी व्दि – लिफाफा ( पेटी ) पध्दतीने **B -1** निविदा मागवित आहे. निविदे बाबतच्या या व्यतिरिक्त असलेल्या अटी व शर्ती निविदा फॉर्म मध्ये नमुद केल्या असुन निविदा फॉर्म विक्री व निविदा प्रक्रियेबाबतचा तपशिल खालिल प्रमाणे.

| Sr.No | Envelopes | Start Date & Time | Expiry Date & Time |
|---|---|---|---|
| 1 | निविदा विक्री | 15-11-2022 10:00 | 21-11-2022 16:00 |
| 2 | निविदा स्विकृती | 15-11-2022 16 :00 | 21-11-2022 17:45 |
| 4 | तांत्रिक लिफाफा उघडणे | 22-11-2022 10:00 | 22-11-2022 14:00 |
| 5 | व्यापारी लिफाफा उघडणे | 23-11-2022 10:00 | 23 -11-2022 14:00 |

| निविदा सुचना क्रमांक | कामाचा तपशिल | लेखाशिर्षक | कामाची निविदा रक्कम (G.S.T.व्यतिरिक्त ) | निविदा संच किंमत GST.सह (ना परतावा) | बयाना रक्कम | कामाची मुदत | ठेकेदाराचा वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 1 28/64 | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.14 मधील श्रीरामनगर मेन रोड येथे रस्ता कॉक्रीटीकरण करणे (पवार घर ते आनंदकर ते काळे घर) | अतिरीक्त चटई क्षेत्र निर्देशांकापोटी प्रिमियम रक्कम | रू.3,92,054/- | 590/- | रू.4,000/ | 3 महीने | वर्ग 8 व त्यावरील |

## सर्वसाधारण निविदेचा तपशिल

| | |
|---|---|
| 1 | सदर कामाबाबत निविदा अटी शर्ती इ बाबतचा सर्व तपशील निविदा संचामध्ये व जाहिर टेंडर नोटीस ऑनलाईन http://amc.gov या संकेत स्थळावर पहावयास उपलब्ध आहे. |
| 2 | निविदा संचाची विक्रीस सार्वजनिक बांधकाम विभाग, नविन प्रशासकीय इमारत औरंगाबाद रोड,अहमदनगर येथे चालू आहे |
| 3 | निविदा विक्रीच्या शेवटच्या दिवशी संच प्राप्त न झाल्यास व स्विकृती च्या शेवटच्या दिवशी सादरीकरण न झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी निविदा धारकाची राहील. |
| 4 | शासनाचे सार्वजनिक बांधकाम विभागाकडील शासन निर्णय क्रमांक सीएटी 2017/प्र.क्र.103/इमा.2, मंत्रालय, मुंबई – 32 दि.23/07/2018 अन्वये मजूर सहकारी संस्था, सुशिक्षित बेरोजगार अभियंता व नोंदणीकृत ठेकेदार पात्र राहतील. |
| 5 | तांत्रिक लिफाफा पडताळणी अंती पात्र कंत्राटदाराने" माझा अर्थिक देकार उघडण्यात येवु नये" अथवा " मी स्पर्धेतुन माघार घेत आहे" असे कळविल्यास ते स्पष्टपणे नाकारण्यात येवुन त्याचा अर्थिक देकार उघडण्यात येईल. |
| 6 | उक्त निविदा भरणाऱ्या ठेकेदाराने अहमदनगर महानगरपालिकेच्या सार्व. बांधकाम विभागाकडील विकास कामाचे कार्यारंभ आदेश दिलेले काम किंवा कामे त्याला दिलेल्या मुदतीत पुर्ण न केल्यास ( योग्य कारणाशिवाय ) तो अपात्र राहील. |
| 7 | उक्त निविदा भरणाऱ्या निविदाधारकाने अहमदनगर महानगरपालिकेच्या सार्व. बांधकाम विभागाकडील विकास कामाचे कार्यारंभ आदेश करुन घेणेबाबत पत्र दिल्यानंतर दिलेल्या मुदतीत कार्यवाही न केल्यास सदरचा निविदाधारक अपात्र राहील. |
| 8 | तांत्रिक लिफाफ्यामध्ये कागदपत्रे अपुर्ण असल्यास संबंधित ठेकेदारास कोणतीही मुदत न देता अपात्र करण्यात येईल. कारण सर्व कागदपत्रांची पुर्तता करणे आवश्यक आहे व ती किरकोळ स्वरुपाची नाहीत. |



Scanned with OKEN Scanner

| | |
|---|---|
| 9 | जाहिर-निविदा सादरीकरण द्वि लिफाफा पध्दतीने करण्यात येईल. |

| सर्वसमावेशक अटी - शर्ती | |
|---|---|
| 1 | संबधीत ठेकेदाराने अहमदनगर महानगरपालिकेकडे योग्य त्या वर्गाची नोंदणी करुन प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे. |
| 2 | सदर कामाची निविदा संच खरेदी किंमत व बयाणा रक्कम बांधकाम विभागाकडे भरावी. |
| 3 | निविदा सादरीकरण हे दोन पाकीट पध्दतीने( Technical व Commercial bid) करणे आवश्यक आहे. |
| 4 | <u>सिलबद तांत्रिक लिफाफा क्र. 1</u> मध्ये पुढील कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे |
| अ) | इनकम टॅक्स प्रमाण पत्र प्रत मागील 3 वर्षाचे आवश्यक. |
| ब) | ई.पी.एफ.व जी.एस.टी.रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र प्रत. |
| क) | सोबत जोडलेल्या यादीतील कंत्राटदारानुसार सन.2011-12 ते 2016-17 पर्यंतचे ई.पी.एफ. भरणा केलेबाबतचे रु. 100/- च्या स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञा पत्र जोडणे अनिवार्य).सोबत नमुना 'ब' |
| ड) | मागील 3 वर्षात हाती घेतलेल्या व पूर्ण केलेल्या कामांच्या किंमतीसह माहितीचा तपशिल कागदपत्रे फॉर्म नं. I मध्ये सादर करणे आवश्यक आहे. |
| घ) | मागील 7 वर्षामध्ये समकक्ष कामे केलेल्या कामांची यादी फॉर्म नं. III ( निविदेतील कामाच्या 50% समकक्ष कामे केले असले पाहीजे.) |
| च) | सदर कामाकरीता उपलब्ध असलेल्या कर्मचारी यांची यादी फॉर्म नं. V मध्ये भरावी. व Declaration Of The CONTRACTOR वर माहिती भरुन स्वाक्षरी करुन त्याची प्रत सोबत जोडावी. |
| 5 | तांत्रिक लिफाफा क्र. 1 मध्ये जोडलेल्या कागदपत्रांच्या सत्यतेबाबत निविदे मध्ये दिलेल्या नमुन्यात रु. 500/- च्या स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञा पत्र निविदा नोटीस प्रसिध्दीच्या दिनांकापासुन 90 दिवसाचे आतील तारखेची जोडणे आवश्यक आहे. यशस्वी ठेकेदारास मुळ प्रत कार्यारंभ आदेशापुर्वी देणे बंधनकारक राहील) .सोबत नमुना 'अ' |
| 6 | <u>सिलबंद दराचा लिफाफा क्र 2</u> मध्ये संबंधीत ठेकेदाराने निविदा संचामधील <u>Tender for Works</u> वर दर नमुद करुन स्वाक्षरीसह सोबत जोडणे आवश्यक आहे. |
| 7 | अटीयुक्त निविदा विचारात घेतली जाणार नाही |
| 8 | यशस्वी ठेकेदारास योग्य किंमतीच्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करुन द्यावा लागेल. |
| 9 | यशस्वी ठेकेदारास कामगार विमा कार्यारंभ आदेश पुर्वी सादर करावा लागेल. |
| 10 | सर्व साहीत्य भारतीय रस्ते माणकाप्रमाणे असणे आवश्यक आहे वरील कामासाठी वापरण्यात येणारे साहीत्य (मटेरीयल) योग्य असल्याबाबतचा प्रयोगशाळेकडील अहवाल जिल्हास्तरिय यंत्रणेकडून तपासणी करुन घ्यावी व शासन धोरणा प्रमाणे ( थर्ड पार्टी ) तांत्रिक लेखा परिक्षण हे मा.प्राचार्य, शासकिय अभियांत्रिकी महाविद्यालय, ऑरंगाबाद किंवा पुणे यांचेकडुन ऑडीट करणे बंधनकारक आहे. तसेच सदर कामाचा तांत्रिक लेखा परिक्षण अहवाल शासकिय यंत्रणेकडे भरताना पावती ' आयुक्त, अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर' करिता ............... ( ठेकेदाराचे नाव) अशाप्रकारे ठेकेदाराने स्वखर्चाने करुन घेउन त्याचे देयक महानगरपालिकेकडे सादर केल्यास त्याचा परतावा करण्यात येईल. तांत्रिक लेखा परिक्षण अहवाल इकडेस प्राप्त झाल्याशिवाय देयक प्रस्तावित करण्यात येणार नाही. 3 लक्षच्या वरील सर्व विकास कामांना ( मनपा फंड/ शासन निधी/आमदार व खासदार निधी) तांत्रिक लेखा परिक्षण बंधनकारक आहे. त्यापैकी 5 लक्षपर्यंत मनपा निधीतील कामांचे तांत्रिक लेखा परिक्षण प्राचार्य, शासकिय तंत्र निकेतन, अहमदनगर यांचेकडुन करुन घेणेस मुभा राहिल. |
| 11 | शासन निर्णय क्रमांक: संकिर्ण-2018/प्र.क्र.151/इमारती-2, दि.14 जानेवारी, 2019 मध्ये नमूदप्रमाणे दोष दायित्वाचा कालावधी निश्चित करण्यात आलेला आहे, त्यानुसार सुरक्षा अनामत व Performance Secutiy Deposit हे दोष दायित्व कालावाधी पुर्ण झालेनंतरच परतावा करण्यात येईल. दोष दायित्व कालावधी काम पुर्ण झाल्याच्या दिनांकापासुन लागु राहील. दोषदायित्व कालावधीत काम खराब झाल्याचे दिसुन आल्यास तसेच याबाबत इकडील विभागाने कळविल्यानंतर 15 दिवसात दुरुस्ती करणे बंधनकारक राहिल. |
| 12 | यशस्वी ठेकेदारास कामापोटी 2.5% (टक्के) अनामत रक्कम रोखीने भरावी लागेल किंवा कार्यारंभ आदेश पुर्वी सेव्हिंग बॅक डिपॉझिट गव्हर्रमेंट प्रॉमिसरी नोटस किंवा नॅशनल सेव्हिंग सर्टीफिकेट अथवा एफ.डि.आर. स्वरुपामध्ये महानगरपालिकेच्या नावे करुन दिलेल्या असल्यास स्विकारण्यात येईल.व उर्वरीत रक्कम बिलातुन वसुल करण्यात येईल |
| 13 | कुठलेही साहीत्य मटेरीयल महानगरपालिका पुरविणार नाही. |



Scanned with OKEN Scanner

| | |
|---|---|
| 14 | सर्व साहीत्य भारतीय रस्ते माणकाप्रमाणे असणे आवश्यक आहे वरील कामासाठी वापरण्यात येणारे साहीत्य (मटेरीयल) योग्य असल्यावावतचा प्रयोगशाळेकडील अहवाल जिल्हास्तरिय यंत्रणेकडून तपासणी करुन घ्यावी . |
| 15 | डांबरीकरणाच्या कामासाठी दोष दायित्व कालावधी 3 वर्षे , कॉक्रिटच्या कामासाठी दोष दायित्व कालावधी 3 वर्षे, पुल बांधणेचे कामासाठी 10 वर्ष व रस्ते पॅचिंग करणेसाठी 1 वर्ष, नवीन इमारतीचे कामासाठी 10 वर्षे, नवीन गटर/ ड्रेनेज साठी 2 वर्षे इतका राहील. तसेच सुरक्षा अनामत व **Performance Secutiy Deposit** हे दोष दायित्व कालावाधी पुर्ण झालेनंतरच परतावा करण्यात येईल. दोष दायित्व कालावधी काम पुर्ण झाल्याच्या दिनांकापासुन लागे राहील. |
| 16 | टेंडर मधील दर टेंडर उघडलेपासुन 180 दिवस ग्राह्य राहतील. |
| 17 | सार्व. बांधकाम विभाग , शासन परिपत्रक कमांक सीएटी/2017/प्र.क्र.08/इमा-2 दि.26 नोव्हेंबर, 2018 नुसार निविदा किंमतीच्या 1% ते 10% कमी दरापर्यत 1% व 10% पासुन 15% पर्यंत प्रती टक्क्याला 1% प्रमाणे कमी दरापर्यंत – 5% तसेच 15% चे पुढील कमी दरापर्यत पती टक्क्यास 1% प्रमाणे डी.डी.सादर करणे अनिवार्य आहे. तसेच लिफाफा 2 उघडल्यानंतर प्रथम न्युनतम देकार सादर करणाऱ्या एल-1 निविदाकाराने " Additional Performance Security Deposit" आठ दिवसाच्या आत शहर अभियंता यांच्या कार्यालयात जमा करावा. आठ दिवसांची मुदत कोणत्याही कारणासाठी शिथीलक्षम असणार नाही. व सदर अनामत रक्कम कामाचा दोष दायित्व कालावधी संपल्यानंतर परत करण्यात येईल. |
| 18 | सदरच्या कामांवरील साहित्याचे सक्षम प्राधिकरणाचे गुणवत्ता प्रमाणपत्र (Test Report) सादर करणे बंधनकारक आहे. |
| 19 | डेप्युटी डायरेक्टर ऑफ इंश्युरन्स महाराष्ट्र राज्य यांचे कडील प्रविनि२-2310 सा.बां.वि/.विमा वसुली/अभि 3 दि.08/09/2010 नुसार शासकीय विमा कार्यारंभ आदेशापुर्वी प्राप्त करुन घेणे अथवा 25 लक्षापर्यंत 1% व 25 लक्षचे पुढील रकमेस 0.5% प्रमाणे रोख स्वरुपात भरणे बंधनकारक आहे. |
| 20 | कोणत्याही परिस्थीतीत भाववाढ देय असणार नाही. |
| | कामाचे देयक उपलब्ध निधी प्रमाणे प्रदान करण्यात येईल. |
| 21 | नियमानुसार लागु असलेल्या सर्व शासकीय कपाती निविदाधारक यांनी सोसावयाच्या आहेत. |
| 22 | काळ्या यादीत नाव नसलेबाबत व पदाधिकारी/ अधिकारी यांचेशी व्यवसायिक हितसंबंध नसलेबाबतचे रु.100/- चे स्टॅम्पपेपरवर प्रतिज्ञापत्र सादर करणे बंधनकारक आहे. |
| 23 | भुयारी गटार योजनेअंतर्गत कामाचा समावेश असल्यास कामाचे कार्यारंभ आदेश भुयारी गटर योजनेचे काम झाल्यानंतर देण्यात येतील. |
| 24 | जनहित याचिका क्र.71/2013 अन्वये मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचे आदेशान्वये काम करणेची व गुणवत्ता राखण्याची जबाबदारी संबंधीत निविदाधारक यांची राहील. |
| 25 | कोणतीही निविदा स्वीकारणे,नाकारणे अथवा रद्द करणे याबाबतचे अंतिम अधिकार मा. आयुक्त, अहमदनगर महानगरपालिका यांना राहतील. |

| रस्ते डांबरीकरण व कॉक्रिट करणेचे कामांसाठी ( रस्ते दुरुस्तीसह ) असणाऱ्या तरतुदी खालीलप्रमाणे | |
|---|---|
| 25 | रस्त्याच्या कामांसाठी आवश्यक ती यंत्र सामुग्री जसे हॉट मिक्स/ड्रम मिक्स प्लॅंट ,सेंसर /मेकॅनिकल पेव्हर फिनीशर मेकॅनिकल अस्फाल्ट स्प्रेअर ,व्हायब्रेटरी रोलर तसेच कॉक्रिटच्या कामासाठी RMC Plant अथवा Transit Ready Mixer बंधनकारक आहे व खालील नमुद मशिनरी निविदा धारकाच्या मालकीची अथवा रक्कम रु. 100/- च्या स्टॅम्प पेपरवर भाडेतत्वाचा करारनामा कामाचे नाव नमुद असणारे प्रतिज्ञा पत्र असणे आवश्यक आहे. मशिनरीच्या मुळ कागदपत्रांची माहिती फॉर्म नं II भरुन जोडण्यात यावी तसेच खालील नमुद 1 ते 6 बाबत कागदपत्रांच्या छायांकित प्रती जोडणे आवश्यक आहे. ( नमुना ' प्रपत्र क ' |
| | (1) RMC Plant अथवा Transit Ready Mixe चा Valid Calibration Report ची प्रत सोबत जोडणे आवश्यक. |
| | (2) वरील नमुद सर्व मशिनरी सुस्थितीत असल्याचे चिफ इंजिनियर (मॅकेनिकल) यांचेकडुन (MOST with SCADA) प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. |
| | (3) प्लॅंट मनपा.हद्दीपासुन 25 कि.मी.चे आंत असलेबाबत निविदा प्रसिध्दीच्या दिनांकाचे एक वर्षाचे आतील कालावधी शहर अभियंता,अहमदनगर महानगरपालिका यांचे प्रमाणपत्र आवश्यक आहे. |
| | (4) डांबरीकरणाच्या कामासाठी मोडर्न ड्रम मिक्स प्लॅंट (हॉट मिक्स प्लॅंट) प्लॅंट हा किमान 30 ते 40 मे. टन / तास व त्यावरील क्षमतेचा असणे आवश्यक आहे. |



Scanned with OKEN Scanner

| | |
|---|---|
| | (5) डांबरीकरणाचे / कॉंक्रिटीकरणाचे शासकीय संस्थांचे Design Mix ठेकेदाराच्या नावाने असल्याचा 3 वर्षाच्या आतील मुळ अहवाल सार्व.बांधकाम विभाग, मनपा, अहमदनगर या विभागाकडे सादर केलेबाबतचा दाखला [illegible]णे अनिवार्य.आहे. |
| | (6) निविदाधारक डांबरी रस्त्याच्या कामाबाबत डांबराचे चलन सादर करणे बंधनकारक आहे. |

मा.आयुक्त सो.यांचे मान्यतेने

(एस.आर.निंबाळकर)
उप अभियंता
अहमदनगर महानगरपालिका

(एस.के.इथापे)
शहर अभियंता
अहमदनगर महानगरपालिका

पृत : 1) प्रसिध्दी विभाग प्रमुख, मनपा.अ.नगर यांना सदरची जाहीर नोटीस मा.शासनाचे सार्वजनिक बांधकाम विभागाकडील शासन निर्णय क्रमांक सीएटी 2017/प्र.क्र.8/इमा.2, मंत्रालय,मुंबई – 32 दि.12 एप्रील 2017 मध्ये नमुद केल्यानुसार वर्तमान पत्रात प्रसिध्द करणेसाठी मंजुर रिपोर्टच्या छायांकीत प्रतीसह.

2) म्यु.पल हवालदार, मनपा.अ.नगर यांस सदरची नोटीस मनपाच्या नोटीस



Scanned with OKEN Scanner

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**

**अतिरीक्त चटई क्षेत्र निर्देशांकापोटी प्रिमियम रक्कम सन 2022-23 अंतर्गत**

फेर जाहिर निविदा क्र.1/२८/६४/सन 2022-2023 ची निविदा सुचना

**अतिरीक्त चटई क्षेत्र निर्देशांकापोटी प्रिमियम रक्कम** अंतर्गत 01 कामाची फेर जाहिर निविदा क्र.२८/६४/ सन 2021-2022 द्वि.लिफाफा पध्दतीने (पेटी पध्दतीने मागविणेसाठी अहमदनगर महानगरपालिकेच्या http://amc.gov.in या वेबसाइटवर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. तरी याचे संबंधितांनी नोंद घ्यावी

उप-अभियंता<br>अहमदनगर महानगरपालिका

शहर आभियंता<br>अहमदनगर महानगरपालिका

प्रत : १) प्रसिध्दी अधिकारी,प्रसिध्दी विभाग, म.न.पा.अ.नगर यांना सदर ई - निविदा बाबतची सुचना वर्तमान पत्रात प्रसिध्द करणेसाठी (२ प्रती ) मंजूर रिपोर्टच्या छायांकित प्रतीसह

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**

**अतिरीक्त चटई क्षेत्र निर्देशांकापोटी प्रिमियम रक्कम सन 2022-23 अंतर्गत**

फेर जाहिर निविदा क्र.1/२८/६४ /सन 2022-2023 ची निविदा सुचना

**अतिरीक्त चटई क्षेत्र निर्देशांकापोटी प्रिमियम रक्कम** अंतर्गत 01 कामाची फेर जाहिर निविदा क्र. २८/६४/ सन 2021-2022 द्वि.लिफाफा पध्दतीने (पेटी पध्दतीने मागविणेसाठी अहमदनगर महानगरपालिकेच्या http://amc.gov.in या वेबसाइटवर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. तरी याचे संबंधितांनी नोंद घ्यावी

शहर आभियंता<br>अहमदनगर महानगरपालिका

प्रत : १) प्रसिध्दी अधिकारी,प्रसिध्दी विभाग, म.न.पा.अ.नगर यांना सदर ई - निविदा बाबतची सुचना वर्तमान पत्रात प्रसिध्द करणेसाठी (२ प्रती ) मंजूर रिपोर्टच्या छायांकित प्रतीसह



Scanned with OKEN Scanner